सत्यमेव जयते

अनुसूचित जाती कल्याण समिती

(२०१८-२०१९)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

सोलापूर व ठाणे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हापरिषद कार्यालय सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय व महानगरपालिका कार्यालय यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा.....

दहावा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१९

अनुसूचित जाती कल्याण समिती

(२०१८-२०१९)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

सोलापूर व ठाणे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हापरिषद कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय व महानगरपालिका कार्यालय यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा....

दहावा अहवाल

एचबी २४१५—१

अनुसूचित जाती कल्याण समिती
(सन २०१७-२०१८)

समिती प्रमुख

(१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) डॉ. मिलिंद माने, वि.स.स.
(४) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(५) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(६) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(७) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.
(८) श्री. गौतम चाबुकस्वार, वि.स.स.
(९) श्री. धनाजी अहिरे, वि.स.स.
(१०) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, वि.स.स.
(११) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स.
*(१२) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१३) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(१४) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.
(१५) रिक्त

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(३) श्री. आनंद राहाटे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी

टीप-

* श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

अनुसूचित जाती कल्याण समिती
(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(५) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(७) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(८) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(९) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स.
(१०) श्री. नरहरी झिरवाळ, वि.स.स.
(११) श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.
(१२) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१३) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.
(१४) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(१५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	. .
(१)	अहवाल (सोलापूर व ठाणे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, जिल्हापरिषद कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, महानगरपालिका कार्यालय तसेच जिल्ह्यातील अन्य कार्यालयात अनुसूचित जाती प्रवर्गातील रिक्त असलेली पदे, बिंदुनामावली तपासणीसाठी सादर न करणे, तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना योजनानिहाय कामांत आढळलेल्या त्रुटी इत्यादी विषयी संदर्भात).	१-२८
(२)	परिशिष्ट " एक " जिल्हाधिकारी, सोलापूर व जिल्हापरिषद, ठाणे कार्यालय यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती (प्रपत्र " अ ", " ब " पहावे)	२९-३४
(३)	परिशिष्ट " दोन " (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त).	३५-४७

प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा दहावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक २० ते २२ जून, २०१७ व दिनांक ५ ते ६ जुलै, २०१७ या कालावधीत अनुक्रमे सोलापूर व ठाणे येथे बैठक घेण्यात आली. उक्त बैठकीत सोलापूर व ठाणे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हापरिषद कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, महानगरपालिका कार्यालय येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांसंदर्भातील कामांना भेटी देऊन चर्चा करण्यात आली.

उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १६ जानेवारी, २०१८ व दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी सोलापूर व ठाणे जिल्हा बैठकीसंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीचा अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व किरकोळ दुरुस्तीसह तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९.

हरिष पिंपळे,
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

अहवाल

जिल्हाधिकारी, सोलापूर

जिल्हाधिकारी, सोलापूर या कार्यालयातील शिपाई संवर्गातून कोतवाल व लिपिक पदावर पदोन्नतीने व लिपिक संवर्गातून अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नतीने भरावयाचा अनुशेष :

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक २० जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीने लिपिक टंकलेखकाची अनुसूचित जातीसाठी राखीव असलेली पदोन्नतीने भरावयाची ८ पदे रिक्त असल्याबाबत विचारणा केली असता लिपिक पदासाठी शिपाई संवर्गातून पदोन्नती देण्यात येते. शिपाई संवर्गात २१४ पदे मंजूर असून अनुसूचित जाती प्रवर्गासाठी २८ पदे राखीव आहेत. प्रत्यक्षात अनुसूचित जाती प्रवर्गात २९ पदे कार्यरत आहेत. लिपिक पदाच्या पदोन्नतीसाठी इयत्ता दहावी उत्तीर्ण व टंकलेखक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असून एकूण ५ शिपाई दहावी उत्तीर्ण झालेले आहेत, २ शिपाई पदांवरील कर्मचा-यांना लिपिक पदावर काम करण्याची इच्छा नसल्याचे कळविले आहे. एक शिपाई कर्मचारी अनधिकृतपणे गैरहजर असल्यामुळे ही ८ पदे भरता आली नसल्याचे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. माळशिरस विभाग कार्यालयातील अनुसूचित जातीच्या कर्मचा-यांसाठी राखीव असलेल्या शिपाई संवर्गातील १ पद रिक्त असल्याबाबत समितीने विचारणा केली असता श्री. सावंत, शिपाई दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी नियत वयोमानानुसार शासन सेवेतून कार्यमुक्त झाले आहेत तेव्हापासून सदरचे पद रिक्त आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी २०१६ अन्वये गट ड मधील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्याबाबत निदेशित केल्यामुळे पद भरण्यात आलेले नाहीत. शिपाई संवर्गातील पदे निरसित करण्याबाबत शासनाचे निर्देश असताना शिपाई संवर्गातील पदे कोतवाल संवर्गामधून भरण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असल्याचे निवासी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी समितीच्या निदर्शनास आणले. तसेच पूर्वी शिपाई संवर्गातील पदांमधून लिपिक संवर्गाची २५ टक्के पदे घेण्यात येत होती, परंतु आता शिपाई संवर्गाची सर्वच पदे निरसित करण्याबाबत शासनाकडून निर्देश आल्यामुळे कोतवाल संवर्गामधून शिपाई पदे घेण्यासंदर्भात मार्गदर्शन मागितल्याचे जिल्हाधिकारी सोलापूर यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीच्या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये शिपाई संवर्गातून लिपिक पदावर पदोन्नतीने

भरावयाच्या ८ पदांचा अनुशेष केव्हापासून आहे याबाबत समितीने विचारणा केला असता मंजूर पदानुसार २५ टक्के पदे वर्ग ४ मधून पदोन्नतीने भरावयाची असून वर्ग ४ मधील एकूण ४ शिपाई या पदांसाठी पात्र असूनही त्यांनी काम करण्याची इच्छा नसल्याबाबत लेखी कळविले आहे व एक शिपाई कायमस्वरुपी गैरहजर आहे तसेच दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी लिपिक संवर्गातून अव्वल कारकून संवर्गात ३ कर्मचा-यांना पदोन्नती दिली असून त्यातील २ कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांची नावे समितीस देण्यात येतील तसेच माळशिरसमध्ये शिपाई पद सेवानिवृत्तीमुळे रिक्त झाले असून २५ टक्के पदे "ड" संवर्गातून भरण्याची तरतूद असल्याने शिपाई संवर्गातील पदे कोतवाल संवर्गात पदोन्नतीने भरण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे कार्यालयाकडे मंजुरीसाठी माहे जुलै, २०१७ मध्ये लेखी पत्राद्वारे पाठविण्यात आले आहे, (**प्रपत्र अ पहावे**) मंजुरी प्राप्त होताच पदे भरण्यात येतील व याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात शिपाई संवर्गातून लिपिक व कोतवाल पदी पदोन्नतीने भरावयाची पदे रिक्त आहेत. पदे भरणेबाबत विभागीय आयुक्त यांच्या मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावास मंजुरी घेऊन पदोन्नतीची रिक्त पदे भरण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हापरिषद सोलापूर

(१) सन २०१२ ते मार्च, २०१४ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (फवारणी) या राखीव ४ पदांच्या अनुशेषाबाबत :—

जिल्हा बैठकीच्या वेळी झालेल्या बैठकीत सन २०१२ ते मार्च, २०१४ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (फवारणी) या राखीव असलेल्या ४ पदांचा अनुशेष असून पात्र कर्मचारी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता आरोग्य सेवक या पदासाठी एकूण २९८ पदे मंजूर आहेत. सदर पदाचे नामनिर्देशन व पदोन्नतीचे प्रमाण ९०:१० असे आहे. त्यानुसार १० टक्के नुसार पदोन्नतीसाठी ३० पदे सार्वजनिक आरोग्य विभागाकडील क्षेत्रिय कर्मचा-यामधून प्राप्त झालेली नाहीत. महासंचालक (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे यांनी दिनांक २० जानेवारी २०१० अन्वये नियमित

क्षेत्रिय कर्मचारी उपलब्ध नसल्याने राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध करुन देता येत नाहीत असे कळविले आहे. त्यानंतर या कार्यालयाकडून दिनांक १० फेब्रुवारी २०१० रोजी आयुक्त, विकास शाखा, पुणे विभाग यांचेकडे पदे भरण्यासाठी मागणी केली होती व याबाबत सहायक आयुक्त, अतिरिक्त संवर्ग कक्षानी पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविल्यानुसार दिनांक २० डिसेंबर २०१६ रोजी उमेदवार उपलब्ध होताच पदे भरण्यात येतील, असे लेखी माहितीद्वारे समितीच्या निदर्शनास आणले.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीच्या वेळी सन २०१२ ते मार्च, २०१४ या कालावधीत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (फवारणी) या संवर्गातील राखीव असलेल्या ४ पदांच्या अनुशेषाबाबत समितीने विचारणा केली असता हिवताप किंवा हत्तीरोग किंवा जलजन्य रोग या कॅडरमधून आरोग्य सेवक (फवारणी) हे पद भरण्याबाबत विभागीय आयुक्ताकडे मागणी केलेली आहे. या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे सदरहू पदे भरण्यात आलेली नाहीत. या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यावर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच आरोग्यसेवक पदाची एकूण २९८ पदे मंजूर असून सदरहू पदे आरोग्य संचालक या कार्यालयातून भरण्यात येतात. या मंजूर पदामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील सन २००३ च्या आकृतीबंधानुसार एकूण २४ पदे राखीव होती परंतु सन २००७ मध्ये आकृतीबंधात बदल होऊन २४ पदांऐवजी १४ पदे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (फवारणी) या राखीव पदावर पदोन्नतीने पात्रताधारक उमेदवार मिळत नसल्यामुळे ही पदे रिक्त आहेत.नवीन आकृतीबंधानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १४ पदे राखीव असल्याने आरोग्य संचालक यांनी पात्रतेत शिथिलता आणून पदोन्नतीने रिक्त असलेली आरोग्य सेवकाची पदे भरणेबाबत त्वरित निर्णय घेण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(२) आरोग्य सेवक या पदाची बिंदुनामावली तपासण्यास झालेला विलंब :—

जिल्हा बैठकीच्या वेळी झालेल्या बैठकीत समितीने आरोग्य सेविकेचे पद सन २०१४ पासून रिक्त असून बिंदुनामावली नोंदवही केव्हा तपासण्यात आली याबाबत विचारणा केली असता बिंदुनामावली माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये तपासण्यात आली आहे. सन २०१५ मध्ये भरती

प्रक्रिया राबविण्यात आल्यामुळे ७५ टक्क्यानुसार जी पदे रिक्त ठेवावयाची होती, ती पदे इतर प्रवर्गात अतिरीक्त झाल्यामुळे पदे रिक्त झाले असून हे पद आंतरजिल्हा बदलीने भरण्यात आले आहे. तसेच बंधपत्रावर घेतलेल्या १५२ एएनएम कर्मचा-यांची बिंदुनामावली न तपासता थेट समायोजित करण्यात आल्यामुळे पदे अतिरिक्त दिसत आहेत. भरती प्रक्रिया राबविताना अनुसूचित जाती प्रवर्गाचे १ पद व इतर प्रवर्गातील १४ पदे अतिरिक्त ठरल्यामुळे आरोग्य सेविका १ पदाची जाहिरात देता आली नाही अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी समितीस दिली.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीच्या वेळी आरोग्य सेवक या पदाची बिंदुनामावली तपासण्यास आरोग्य विभागाकडून विलंब झाला आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद सोलापूर यांनी बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी सन २००८ नंतर सन २०१६ मध्ये केली आहे तसेच आरोग्य विभागामध्ये सरळसेवा व पदोन्नतीने ४ संवर्ग असून दिनांक २ फेब्रुवारी २०१६ रोजी बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष पुणे यांच्याकडून करण्यात आली आहे असे समितीला सांगितले. बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी सन २००८ नंतर २०११ मध्ये करणे आवश्यक असताना बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी दिनांक २ फेब्रुवारी २०१६ रोजी केली आहे, तसेच बिंदूनामावली नोंदवही तपासणी न करता सन २००८ ते २०११ या कालावधीत पदे अतिरिक्त भरती करण्यात आली व बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी दर तीन वर्षांनी करून घेणे ही संबंधित अधिका-याची जबाबदारी असतानाही सन २००८ ते सन २०१६ या कालावधीत ज्या संवर्गातील बिंदुनामावलीची तपासणी न करता कर्मचा-यांना पदोन्नती दिली आहे. सबब बिंदुनामावली नोंदवहीची तपासणीच्या विलंबास जबाबदार असलेल्या अधिका-यांवर तातडीने कारवाई करावी असे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, सोलापूर यांना निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

आरोग्य सेवक या पदाची बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी न करता सन २००८ ते २०१६ या कालावधीत कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आल्याने शासकीय नियमांचे उल्लंघन झाले आहे बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी न करता पदोन्नतीने पद भरण्यास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांची चौकशी करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी

व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(३) अक्कलकोट येथील विशेष घटक योजनेतंर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत :—

जिल्हा बैठकीच्या वेळी झालेल्या बैठकीत समितीने सन २०१२-१३ मध्ये १७८ लाभार्थ्यांना विहिरीचा लाभ दिला असून ५१३ लाभार्थ्यांना इतर बाब घटकांतर्गत शेती साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांऐवजी नगरपरिषदेअंतर्गत शहरी भागातील लाभार्थ्यांना लाभ दिल्याची तक्रार प्राप्त झाली आहे या प्रकरणी अधिका-यांनी संगनमत करून यामध्ये एकूण ४०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे लाभार्थी अस्तित्वात नसताना बनावट नावाने अनुदानाचे वाटप करण्यात आले. या गैरव्यवहाराप्रकरणी अनेक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली असून या गैरव्यवहाराबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून या संपूर्ण प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिका-यांनी तातडीने चौकशीची कारवाई पूर्ण करावी असे समितीने मत नोंदविले असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी गुडेवार समिती घटित करण्यात आली आहे. यामध्ये पैसे वसूल करणे आणि गुन्हे दाखल करणे असे दोन भाग समाविष्ट आहेत. यातील झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम वसूल करावयाची असल्यास तर ती रक्कम खुप जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे सीआयडी चौकशी करून या प्रकरणी जो काही निर्णय घेण्यात येईल त्यानुसार तातडीने कारवाई करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीच्या वेळी अक्कलकोट येथील विशेष घटक योजनेतंर्गत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी तत्कालिन कृषी अधिकारी यांना निलंबित करण्यात आले होते. परंतु झालेल्या गैरव्यवहाराबाबत त्यांच्याकडून कशा प्रकारे रकमेची वसुली करण्यात येणार आहे, असे समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद सोलापूर यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की याप्रकरणातील निलंबित तत्कालिन कृषी अधिकारी यांची उपायुक्त (विकास) पुणे विभाग, पुणे यांचे मार्फत विभागीय चौकशी सुरू आहे तसेच सीआयडीमार्फत सुद्धा चौकशी करण्यात येत आहे. याप्रकरणी अहवाल प्राप्त होताच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी समितीस आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २०१२-१३ मध्ये अक्कलकोट येथील विशेष घटक योजनेंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्याऐवजी नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या शहरी भागातील लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. त्यामुळे मूळ लाभार्थ्यांना डावलून बनावट लाभार्थ्यांना लाभ देण्यात येऊन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित तत्कालिन कृषी अधिकारी यांच्याविरुद्ध उपायुक्त, (विकास), पुणे विभाग पुणे यांच्यामार्फत सुरू असलेली विभागीय चौकशीची कारवाई तसेच सीआयडी मार्फत होणारी चौकशीची कार्यवाही मागील ५ वर्षांपासून सुरू असून जिल्हा बैठकीच्या व साक्षीच्यावेळी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी समितीला तातडीने कारवाई करण्यात येईल, असे आश्वासित केलेले असताना अद्यापपर्यंत कारवाई झालेली दिसून येत नाही. सबब, तत्कालीन कृषी अधिकारी यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या दोन्ही चौकशीची कारवाई तातडीने पूर्ण करण्यात यावी तसेच या गैरव्यवहारास दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचा-याकडून रकमेची वसुली करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे

(१) जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय संवर्गात अनुसूचित जाती प्रवर्गातील पदांचा रिक्त असलेला अनुशेष :—

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक ५ जुलै २०१७ रोजी जिल्हापरिषद ठाणे या कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीच्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी जिल्हापरिषदेमध्ये एकूण ६,२९७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण ५६६९ पदे भरलेली असून एकूण ६३० पदे रिक्त आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता १३% आरक्षणानुसार एकूण ८३८ पदे आरक्षित असून त्यापैकी ७३० पदे भरण्यात आलेली आहेत व अनुसूचित जाती प्रवर्गाची १०८ पदे रिक्त असून काही संवर्गामध्ये पदे जास्त असल्याने एकूण १६४ पदांचा अनुशेष दिसत आहे अशी समितीला माहिती देण्यात आली. विभागनिहाय रिक्त असलेल्या पदांची माहिती समितीस सादर करावी असे समितीने निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली साक्षीच्यावेळी समितीने जिल्हा परिषद कार्यालयात विभागनिहाय व संवर्गनिहाय अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण १६४ पदांचा अनुशेष असल्याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हापरिषद ठाणे यांनी अनुशेषांची एकूण १६४ पदे समायोजनापूर्वीची आहेत. दिनांक १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे व पालघर जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर संपूर्ण रोस्टर बदलले. दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी समायोजन पूर्ण झाल्यानंतर एकूण १२१ पदे अनुशेषांची असून त्यापैकी संवर्गनिहाय पदोन्नतीने १७ पदे रिक्त आहेत तसेच संवर्गनिहाय सरळसेवेची एकूण ४५ पदे व प्राथमिक शिक्षकांची ५९ पदांची भरती टीईटीने करण्यात येणार आहेत.**(प्रपत्र ब पहावे)** तसेच जिल्हापरिषदेमध्ये एकूण ११ विभाग १५ संवर्ग असून बिंदूनामावली नोंदवही दिनांक ३ एप्रिल २०१७ रोजी तपासण्यात आली आहे. या १२१ पदांची भरती करण्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त होताच महापरिक्षा पोर्टलच्या माध्यमातून पदे भरण्यात येणार आहेत, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांनी समितीस आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

दिनांक १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे व पालघर जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ जिल्हापरिषद, ठाणे या कार्यालयातील संपूर्ण बिंदूनामावलीमध्ये झालेल्या बदलानूसार एकूण ११ विभाग व १५ नवीन संवर्ग निर्माण झाले असल्याने जिल्हापरिषद कार्यालयातील दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी पूर्ण झालेल्या समायोजना-नंतर अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण १२१ पदांचा अनुशेष रिक्त आहे. सदर अनुशेष भरण्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त होताच भरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

२) ठाणे जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागात सन २००९ पासून तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना अनुसूचित जातीमध्ये दाखवून नियमबाह्य पद्धतीने नियुक्ती करणे :—

जिल्हापरिषद कार्यालय, ठाणे येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने जिल्हापरिषद शिक्षण विभागातील तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री. अशोक भागवत यांनी अनुसूचित जातीचा अनुशेष भरण्याऐवजी त्या जागेवर खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांची नियुक्ती केल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत विचारणा केली असता शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उप संचालक स्तरावर नेमलेल्या समितीचा अहवाल शिक्षण संचालक यांच्याकडे सादर केला आहे अशी माहिती समितीला देण्यात आली.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या बैठकीवेळी समितीने जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागात सन २००९ पासून श्री. अशोक भागवत

तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना अनुसूचित जातीमध्ये दाखवून नियुक्ती केल्याबाबतची विचारणा केली असता अशाप्रकारे २२ शाळांमध्ये ४२ शिक्षकांच्या नियमबाह्य पद्धतीने नेमणुका झाल्या आहेत. शिक्षण संचालकांनी तत्कालिन शिक्षणाधिकारी यांच्या विरुद्ध शिक्षकांच्या नियमबाह्य पद्धतीने केलेल्या भरतीबाबत चौकशी सुरू केली असून नियमबाह्य व गैरप्रकाराने खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना अनुसूचित जातीमध्ये दाखवून नेमणुका केल्या आहेत, त्या नेमणुका रद्द करण्याबाबत दिनांक ११ जून २०१८ रोजी २२ संस्थांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत. त्यातील ८संस्थांचे खुलासे प्राप्त झाले असून इतर १४ संस्थाना पुनश्चः स्मरणपत्र दिले आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांनी समितीला दिली. तसेच यासंदर्भात तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री. अशोक भागवत यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांची विभागीय चौकशी सुरू केली आहे. श्री. भागवत सध्या सेवानिवृत्त असल्याने व त्यांची चौकशी सुरू असल्याने त्यांचे निवृत्तीवेतन अद्यापही सुरू करण्यात आले नाही असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांनी समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी

ठाणे जिल्हापरिषदेचे तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री. अशोक भागवत यांनी नियमबाह्यरित्या २२ शाळांमध्ये ४२ शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. नियमबाह्य पद्धतीने केलेल्या भरती प्रकरणी श्री. अशोक भागवत यांच्याविरुद्ध सुरू असलेली चौकशी तातडीने पूर्ण करून त्यांच्याविरुद्ध कारवाई प्रस्तावित करावी तसेच नियमबाह्य शिक्षक नियुक्ती प्रकरणी २२ संस्थाना दिनांक ११ जून २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊनही त्यापैकी फक्त ८ संस्थांनी खुलासे दिले आहेत उर्वरित १४ संस्थांनी कोणताही खुलासा सादर केला नाही. या संस्थांना वारंवार स्मरणपत्र देऊनही जाणीवपूर्वक शासनाच्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे. सबब, या शाळा संस्थांचे अनुदान तात्काळ रोखण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

३) सन २०१२ ते २०१७ या कालावधीत वर्षनिहाय २० टक्के सेस फंडातून निधी शिल्लक राहत असल्याबाबत :—

जिल्हापरिषद कार्यालय, ठाणे येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्यावेळी समितीने सन २०१२-२०१७ या कालावधीत वर्षनिहाय जिल्हापरिषदेच्या २० टक्के सेस फंडातून निधी शिल्लक राहण्याची

कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता सन २०१६-२०१७ या वर्षात ५३ लक्ष रुपये अतिरिक्त खर्च झालेला आहे. वैद्यकीय लाभाच्या योजना राबविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून योजनेनुसार निधीचे वाटप करण्यात आले आहे, असे समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांनी समितीस माहिती दिली. तसेच सन २०१६-२०१७ मध्ये एकूण उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम ५ कोटी ८९ लक्ष ४४ हजार रुपये होत आहे व प्रत्यक्षात खर्च ६ कोटी २२ लाख ६१ हजार २३० झालेला आहे, सन २०१६ मध्ये २७ गावे जिल्हापरिषदेमध्ये होती. सद्यस्थितीत ही गावे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात विलीन करण्यात आले, त्यामुळे या गावापासून जे उत्पन्न मिळत होते ते आता कमी झाले आहे. या २७ गावांपासून ठाणे जिल्हापरिषदेला जवळपास ५० टक्के उत्पन्न मिळत होते, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. तसेच सन २०१६-२०१७ चे जिल्हापरिषदेचे एकून उत्पन्न ७० कोटी ९ लाख रुपये असे असून यातील इतर बाबींचा समावेश वगळून एकूण ५६ कोटी १६ लाख रुपयांच्या २० टक्के प्रमाणे ११ कोटी २३ लक्ष रुपये मागासवर्गीयांच्या विकासासाठी खर्च करण्यात येते. त्यापैकी ५ कोटी ६९ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत, असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद ठाणे यांनी समितीस सांगितले. उर्वरित ४ कोटी ५० लक्ष रुपयांचे काय नियोजन करण्यात आले, कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत ? याबाबत समितीने विचारणा केली असता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सायकली पुरविण्यात आल्या आहेत. एका सायकलची किंमत ४९०० रुपये अशी असून लाभार्थ्यांनी सायकल खरेदी करून देयक सादर केल्यानंतर शासन निर्णयानुसार त्यांच्या खात्यामध्ये पैसे हस्तांतर करण्यात येतात. सन २०१५-२०१६ मध्ये सायकल वाटप संदर्भात एकूण ११२९ लाभार्थी मंजूर करण्यात आले होते. ई-टेंडरद्वारे सायकल खरेदी करून लाभार्थ्यांना संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांचे कडून प्रमाणपत्र घेऊन सायकलचे वाटप करण्यात येते. सन २०१६-२०१७ मध्ये ६५७ लाभार्थी पात्र होते. त्यापैकी १६० लाभार्थ्यांनी सायकली खरेदी केली आहे, त्यांना देयके अदा करण्यात आली आहेत. इतर लाभार्थ्यांनी सायकल खरेदी केलेली नाही. शहापूर तालुक्यात ४६ लाभार्थ्यांपैकी ५ लाभार्थी अनुसूचित जातीतील असून त्यांनी सायकल खरेदी केल्यानंतर त्यांच्या खात्यात पैसे ट्रान्सफर केले आहेत, अशी माहिती जिल्हापरिषद, समाजकल्याण अधिकारी, ठाणे यांनी समितीस दिली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकली वाटप करण्यासंदर्भात लाभार्थ्यांकडून प्रथम ४५०० रुपये खर्च करून सायकली खरेदी केल्यानंतर त्यांना याबाबतची देयके अदा करण्यात

येतात. सदरहू पद्धत चुकीची असून शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने जिल्हापरिषदेच्या २० टक्के सेस फंडातून समाजमंदिर, रस्तेदुरुस्तीची, जोड रस्ते दुरुस्तीची केलेली कामे याबाबत समितीने विचारणा केली असता, समाजमंदिर, रस्तेदुरुस्ती व जोडरस्ता दुरुस्तीची ३७० कामे मंजूर करण्यात आली होती. त्यातील २६९ कामे पूर्ण झाली असून एकूण १८ कामे रद्द झाली आहेत.उर्वरित ८६ कामे प्रगतीपथावर असून ही कामे माहे डिसेंबर,२०१८ पूर्वी करण्यात येतील. तसेच २० टक्के सेस फंडाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्याबाबतची कार्यपद्धती नियोजन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर २०१६ या शासन निर्णयान्वये निवड झालेल्या मागासवर्गीय लाभार्थ्यांने प्रथम वस्तू खरेदी करावयाची त्यानंतर खरेदीच्या कागदपत्रांची तपासणी करून लाभार्थ्यांची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत निर्देश आहेत. त्यानुसार बाजारातील उत्तम दर्जाच्या वस्तू विभागानी ठरविलेल्या दरानुसार खरेदी करून त्याची पावती सादर केल्यानंतर अनुदान तात्काळ संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते, असे लेखी माहितीद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांनी समितीस आश्वासित केले. त्यानुसार समितीने साहित्य खरेदी केल्यानंतर देयके सादर करण्याची पद्धत चुकीची असल्याचे मत व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हापरिषद सेस फंडातून दुरुस्तीच्या कामांसाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण ३७० कामांपैकी प्रगतीपथावर सुरू असलेली ८६ कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

उक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.

(४) जिल्हापरिषद, ठाणे अंतर्गत सन २०१२ ते २०१६ या कालावधीत जननी सुरक्षा योजनेअंतर्गत देण्यात आलेले लाभ :—

जिल्हापरिषद कार्यालय, ठाणे येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने सन २०१२ ते २०१६ या कालावधीत जननी सुरक्षा योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या मातांना प्रसुती संदर्भात वर्षनिहाय किती निधी प्राप्त झाला होता, अशी विचारणा केली असता सन २०१२-२०१३ मध्ये एकूण लाभार्थी २८९१६ असून त्यापैकी २२५० लाभार्थी अनुसूचित जातीचे आहेत. यासाठी २८

लक्ष २७ हजार रुपये एकूण तरतूद होती. यापैकी १८ लक्ष ८३ हजार रुपये लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये २११४ अनुसूचित जातीचे लाभार्थी आहेत, त्यांच्यावर १६ लक्ष ९७ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत सन २०१४-२०१५ मध्ये अनुसूचित जातीचे १७९५ लाभार्थी असून त्यांच्यावर १४ लक्ष ५६ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये १४०२ लाभार्थी होते, त्यांच्यावर १० लाख ९७ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये ११८३ लाभार्थी असून त्यांच्यावर ८ लाख ८८ हजार ७०० रुपये खर्च करण्यात आले आहेत. ही रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर डीबीटी द्वारे जमा करण्यात आली आहे. आधारकार्ड, पॅन कार्ड व बँक अकाऊंट एकमेकाशी लिंकअप केले असून उर्वरित लाभार्थ्यांना लाभ एका महिन्यात देण्यात यावा असे समितीने सांगितले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने जिल्हापरिषद, ठाणे मध्ये सन २०१५-२०१६ मध्ये अनुसूचित जातीच्या एकूण ८४५ मातांपैकी ३०० मातांना जननी सुरक्षा योजनेअंतर्गत लाभ देण्यात न आल्याबाबत समितीने विचारणा केली असता या ३०० मातांचा आधार नंबर बँक खात्याशी जोडावयाचा होता. समितीने केलेल्या सूचनेनुसार आधारकार्डचा कार्यक्रम घेऊन ८८६ मातांपैकी ५१६ मातांना जननी सुरक्षा योजनेअंतर्गत लाभ दिला असून उर्वरित ३७० मातांना लवकरात लवकर लाभ दिला जाणार आहे. याकरिता विशेष कॅम्प घेऊन आधार कार्डसंबंधी कार्यवाही करण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सन २०१२ ते २०१६ या कालावधीत जननी सुरक्षा योजनेंअंतर्गत ८८६ पैकी ५१६ मातांना लाभ देण्यात आला असून उर्वरित ३७० मातांना तातडीने लाभ मिळण्याकरिता एक महिन्याच्या आत आधार क्रमांक बँक खात्याशी जोडण्याकरिता विशेष कॅम्प आयोजित करून लाभार्थ्यांना लाभ पुरविण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

महानगरपालिका, सोलापूर

(१) महानगरपालिका कार्यालयातील अनुसूचित जाती प्रवर्गातील वर्ग अ ते ड संवर्गातील रिक्त असलेली पदे भरणेबाबत तसेच संवर्गनिहाय बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात न आल्याबाबत—

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक २० जून २०१७ रोजी सोलापूर महानगरपालिका कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीने महानगरपालिकेत वर्ग अ ते ड संवर्गात अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता, आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की सोलापूर महानगरपालिकेतील वर्ग ब मध्ये एकूण १९० पदे मंजूर असून अनुसूचित जातीसाठी २४ पदे राखीव आहेत त्यापैकी १४ पदे भरलेली आहेत वर्ग-क मध्ये १६७४ पदे मंजूर असून अनुसूचित जातीसाठी २२७ पदे राखीव असून वर्ग-ड मध्ये ३४८५ पदे मंजूर असून त्यापैकी अनुसूचित जातीसाठी ४५६ पदे राखीव आहेत. वर्ग- क व ड मधील अनुशेष नसून बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी सन २०१५ मध्ये करण्यात आली होती. परंतु बिंदूनामावली नोंदवहीमध्ये सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्षाने काढलेल्या त्रृट्यांची पूर्तता करण्यात न आल्याने बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी पूर्ण झाली नसल्याची माहिती आयुक्त, महानगरपालिका यांनी समितीस दिली. महापालिकेच्या बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी सन २०१५ पूर्वी २०१२ मध्ये करण्यात आली आहे. मागासवर्ग कक्षाने बिंदूनामावली नोंदवहीच्या बाबतीत काढलेल्या त्रृट्यांची पूर्तता एक महिन्याच्या आत करावी व रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे समितीने निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या बैठकीच्या वेळी झालेल्या बैठकीत महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५% च्यावर म्हणजेच ४७% पर्यंत गेलेला असल्याने वर्ग-ब मध्ये १० पदांचा अनुशेष सन २०१० पासून आहे. त्यामुळे रिक्त पदे भरण्यात आली नाहीत. नवीन आकृतीबंध तयार करून सदर आकृतीबंधास महानगरपालिका महासभेची मान्यता दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी मिळालेली आहे. याबाबतचा ठराव शासनाकडे सादर करून शासनाची मान्यताप्राप्त होताच सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग यांचे कडून बिंदूनामावली नोंदवही तपासणीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी लेखी माहितीमध्ये समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

सोलापूर महानगरपालिकेत वर्ग अ ते ड संवर्गनिहाय अनुसूचित जाती प्रवर्गातील पदे रिक्त असून महानगरपालिका महासभेकडून नवीन आकृतीबंधाबाबत ठराव शासनाकडे मान्यतेसाठी तात्काळ सादर करून आकृतीबंधास लवकरात लवकर मंजुरी घेण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा व वर्ग अ ते ड मधील संवर्गनिहाय अनुसूचित जाती प्रवर्गातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(२) सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीत अनुसूचित जातीच्या घटकांसाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या राबविण्यात आलेल्या योजना :—

जिल्हा बैठकीच्यावेळी समितीने सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीत अनुसूचित जातीच्या घटकांसाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत याबाबत विचारणा केली असता महापालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात येते. त्यानुसार सन २०१३-१४ मध्ये मंजूर एकूण ७ कोटी ७० लाख रुपये पैकी ६ कोटी ६० लाख रुपये खर्च झाला आहे, सन २०१४-१५ मध्ये मंजूर एकूण ९ कोटी १३ लाख रुपये पैकी ७ कोटी ३० लाख रुपये खर्च झाला आहे, सन २०१५-१६ मध्ये मंजूर एकूण ११ कोटी ७६ लाख रुपये पैकी १० कोटी २९ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. उक्त तीन वर्षात मंजूर एकूण २८ कोटी ६० लाख रुपये पैकी २४ कोटी २१ लाख रुपये खर्च झाला असून एकूण तरतुदींच्या ८४ टक्के खर्च झाला आहे. त्यापैकी सन २०१३ ते २०१६ या कालावधीत एकूण ४ कोटी ३० लाख रुपये शिल्लक राहीले आहेत, अशी माहिती आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी समितीस दिली. याबाबत समितीने महापालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ५% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवरच खर्च करणे व प्रत्येक वर्षाचा निधी त्याच वर्षात खर्च होणे आवश्यक आहे व झालेल्या खर्चातून मागासवर्गीय कल्याणकारी वैयक्तिक व सामूहिक स्वरुपाच्या योजना जलदगतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. अनेकवेळा महापालिकेकडून रस्ते, वीज, पाणी, नळ कनेक्शन,शौचालय इत्यादी कामावरच ५% निधीची रक्कम खर्च केली जाते. या कामाव्यतिरिक्त इतर चांगली कामे दलित वस्त्यांमध्ये करणे आवश्यक आहे. या प्राप्त निधीतून सुसज्ज व अद्ययावत वाचनालये, ग्रंथालये, अभ्यासिका,व्यायामशाळा इत्यादी लोकोपयोगी कामावर रक्कम खर्च करावी असे समितीने निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या बैठकीच्यावेळी झालेल्या बैठकीत आयुक्त, महानगरपालिका यांना महापालिकेकडून ५६ दलित वस्त्या निश्चित केल्या असून ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी मागासवर्गीय भागातील लोकप्रतिनिधींशी चर्चा करून अभ्यासिका व लायब्ररीचे बांधकाम करण्याचे नियोजन असल्याची माहिती समितीस दिली.

अभिप्राय व शिफारशी :

महानगरपालिकेकडून अनुसूचित जातीच्या घटकांसाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या योजनेसाठी राखून ठेवण्यात आलेला ५% निधीतून रस्ते, वीज, पाणी, नळ कनेक्शन व शौचालय या कामांबरोबर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ग्रंथालये, अभ्यासिका, व्यायामशाळा, युपीएससी/ एमपीएससी प्रशिक्षण इत्यादी कामावर रक्कम खर्च करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(३) सन २०१४-२०१५ ते २०१७-२०१८ या वर्षात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणाच्या कामावर झालेला खर्च :—

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०११-१२ ते सन २०१६ पर्यंत एकूण रुपये १८६९.६० लक्ष रक्कम प्राप्त झाली असताना फक्त ७०० लक्ष रुपये रक्कम खर्च करण्यात आली असून रुपये ११६८.३५ लक्ष एवढी रक्कम अखर्चित राहण्यामागची कारणे काय याबाबत समितीने विचारणा केली असता या योजनेंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला सन २०११-१२ ते सन २०१६-१७ पर्यंत एकूण २८ कोटी ७७ लाख रुपये इतके अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी ११ कोटी ८४ लाख रुपये खर्च केले आहेत. सन २०११-१२ मध्ये पूर्ण रक्कम खर्चित असून त्यामधून ७ कामांसाठी एकूण ७७ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे. सन २०१२-१३ मध्ये १ कोटी ५७ लाख रुपयांपैकी १ कोटी ५६ लाख रुपये खर्च झाले आहेत. सन २०१३-१४ मध्ये महानगरपालिकेस अनुदान प्राप्त झाले नव्हते. सन २०१४-२०१५ मध्ये ५९ कामांसाठी ७.३० कोटी रुपये इतकी रक्कम प्राप्त झाली असून ५९ कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी ३७ कामे पूर्ण झाली असून काही कामांच्या बाबतीत रिटेंडर काढण्यात आल्यामुळे बराच कालावधी गेला. अनेक वस्त्यांमध्ये रस्त्यांची कामे मंजूर असतात परंतु त्या भागात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम न झाल्यामुळे रस्त्यांची कामे होऊ शकली नाहीत. तसेच सन २०१५-१६ मध्ये

एकूण ७६ कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ७१ कामे पूर्ण झाली आहेत.माहे जून २०१७ पर्यत ५४ कामे पूर्ण झाली आहेत तसेच गलिच्छ वस्ती निर्मुलनासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नसल्याची माहिती नगर अभियंता, महानगरपालिका सोलापूर यांनी समितीस दिली. समितीने मुख्य लेखापाल यांच्याकडे सन २०१६-१७ बजेटची माहिती मागितली असता माहिती उपलब्ध करून देण्यास विलंब झाला. त्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांचा निधी अखर्चित न ठेवता दलित वस्त्यांमध्ये जी कामे करणे आवश्यक आहेत, ती तातडीने करण्यात यावी तसेच आयुक्तांनी सर्व विभाग प्रमुखांसह मुख्य लेखापाल यांच्यावर तातडीने कारवाई करावी असे समितीने आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी झालेल्या बैठकीत सन २०१४-२०१५ मध्ये एकूण ५९ कामांना मंजुरी देण्यात आली होती. त्यासाठी ७ कोटी ३० लाख ७८ हजार रुपये इतका निधी मंजूर होता, त्यापैकी ५२ कामे पूर्ण करण्यात आली. ४ कामे अन्य निधीतून पूर्ण केली असून ३ कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये एकूण ९५ कामांपैकी ८४ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरीत ३ कामे इतर योजनांमध्ये दाखवून रद्द करण्यात आली आहेत व ८ कामे प्रगतीपथावर आहेत त्यातील दोन खाजगी जागा असल्याने शासकीय नियमानुसार खाजगी जागेवर खर्च करण्याअगोदर ती जागा प्रथम महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, तसेच २०१६-१७ मध्ये एकूण ६१ कामे मंजूर होती, त्यापैकी एक रद्द झाले असून ९ कामे प्रगतीत असून उर्वरित ५१ कामे पूर्ण झाली आहेत. सन २०१७-१८ मध्ये १३ कामे पूर्ण करण्यात आली आहेत व इतर ७३ कामे प्रगतीत आहेत, अशी माहिती आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी समितीस दिली. यावर समितीने सन २०१४ पासून योजनानिहाय किती कामे पूर्ण झाली आहेत, किती प्रलंबित आहेत याबाबतची माहिती समितीस द्यावी असे निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत योजनानिहाय किती कामे केली आहेत, किती कामे प्रलंबित आहेत व किती कामे आक्षेपामुळे प्रलंबित आहेत याची प्रभागनिहाय कामांची माहिती समितीस सादर करावी. सन २०१५-२०१६ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेतील ३ कामे इतर योजनांमध्ये दाखविण्यात आली आहेत, तसेच ८ कामे प्रगतीपथावर आहेत. शासकीय

नियमानुसार खाजगी जागेवर खर्च करण्याअगोदर ती जागा प्रथम महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(४) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबियांना नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून निधी प्राप्त करण्याबाबत :—

जिल्हा बैठकीच्यावेळी झालेल्या बैठकीत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबियांना खाजगी नळ जोडणी सुविधा पुरविण्यासाठी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला, यासाठी शासनाकडून किती अनुदान प्राप्त झाले, त्यापैकी किती अनुदान अखर्चित आहे? अशी समितीने विचारणा केली असता लाभार्थ्यांना प्रती नळ जोडणी ४ हजार रुपये प्रमाणे अनुदान मिळणार होते. त्यानुसार सन २०१५ मध्ये ९ कोटी रुपयांचा एकूण ३३७७ लाभार्थ्यांना नळ जोडणी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून प्रस्तावाला अद्याप मान्यता देण्यात आली नाही किंवा त्रृट्याही काढण्यात आल्या नाहीत. शासनाकडून निधी मंजूर होण्यासाठी महापालिकेच्या वतीने सन २०१६ मध्ये स्मरणपत्र पाठविण्यात आले असून माहे मार्च, २०१७ मध्ये निधीची मागणी केली आहे. परंतु अद्यापपर्यंत निधी प्राप्त झालेला नाही असे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. नळ जोडणी सुविधा मिळण्यासाठीचा निधी तातडीने मिळावा यासाठी महापालिकेने पाठपुरावा सुरु ठेवावा व निधी प्राप्त झाल्यानंतर नळ जोडणी देण्याचे काम पूर्ण करावे तसेच मुख्यमंत्री पेयजल योजनेतून सुद्धा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबियांना नळ जोडणी सुविधा देता येईल का याची तपासणी करावी, असे समितीने निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी झालेल्या बैठकीत सोलापूर महानगरपालिकेकडून या योजनेअंतर्गत प्रकल्प अहवाल (D.P.R) तयार करून मंजुरीसाठी शासनाकडे दिनांक १ डिसेंबर २०१४, दिनांक १७ फेब्रुवारी २०१६, दिनांक २८ मे २०१८ व दिनांक ५ जुलै २०१८ रोजी लेखी पत्राद्वारे सादर केला असून शासनाकडून त्यास अद्यापही मंजुरी मिळाली नाही असे लेखी माहितीद्वारे समितीच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत महापालिकेने पाठपुरावा करून लाभार्थ्यांना नळ जोडणी देण्याबाबत समितीने निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

महानगरपालिकेने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबियांसाठी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मंजुरीसाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रकल्प अहवालास (D.P.R) शासनाने लवकरात लवकर मंजुरी देण्याची कार्यवाही करावी तसेच लाभार्थ्यांना मुख्यमंत्री पेयजल योजनेतून नळ जोडणी सुविधा उपलब्ध करून द्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(५) महानगरपालिका कार्यक्षेत्रात रमाई आवास योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्याबाबत :—

जिल्हा बैठकीच्या वेळी रमाई आवास योजनेअंतर्गत सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या वर्षात प्राप्त झालेले अनुदान व खर्च करण्यात आलेले अनुदान यांत तफावत असून निधी अखर्चित असल्याबाबत समितीने विचारणा केली असता आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी रमाई आवास योजनेअंतर्गत एकूण १४८६ लोकांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ६२० लाभार्थ्यांची घरे पूर्ण झाली आहेत, ३६६ घरकुलांची कामे सुरू आहेत. तसेच ५०० लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुलांची कामे सुरू केली नसल्यामुळे ती प्रलंबित आहेत. काही घरे खाजगी जमिनींवर असल्याने व याबाबतचा उल्लेख शासन निर्णयामध्ये नसल्यामुळे त्यांना घरकुलाचा लाभ देता येत नाही. अशा जमिनीच्या बाबतीत ७/१२ च्या उता-याची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने शासन स्तरावर पाठविल्याचे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्यानुसार समितीने राज्यातील काही महानगरपालिकेअंतर्गत खाजगी जमिनीवर दलित वस्त्या असून त्या दलित वस्त्यांच्या ठिकाणी शासनाच्या सर्व योजना लागू आहेत याची तपासणी करून व आधार घेऊन खाजगी जमिनीवरील दलित वस्त्यांच्या ठिकाणी कामे करावी असे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत एकूण १६१९ लाभार्थ्यांचे उद्दीष्ट निश्चित केले होते त्यापैकी ८९५ घरकुलाचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरित ४०४ घरकुलाची कामे अपूर्ण आहेत. उर्वरित ३२० लाभार्थ्यांना अद्यापही लाभ देण्यात आलेला नाही. या योजनेत काही खाजगी मालकीच्या जागेवरील घोषित झोपडपट्टीमधील एकूण ५७ लाभधारक असल्याने त्यांना लाभ देण्यास अडचणी येत आहेत. तसेच एकूण ६२ खाजगी जागाधारकाकडून बांधकाम परवानगी घेण्याबाबत दिनांक १५ जून २०१५ व दिनांक ५ जुलै २०१६ च्या पत्रान्वये शासनाकडून

मार्गदर्शन मागविले असून याबाबत शासनाचे अभिप्राय अद्यापपर्यंत अप्राप्त असल्याचे लेखी माहितीद्वारे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी :

महानगरपालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेअंतर्गत अद्यापपर्यंत अनुसूचित जाती प्रवर्गातील ३२० लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ झालेला नाही. त्यापैकी ५७ लाभार्थ्यांच्या झोपड्या खाजगी मालकीच्या जागेवर असल्याने अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यास अडथळा निर्माण होत आहे. सबब, राज्यातील नागपूर किंवा अन्य महानगरपालिका क्षेत्रांतर्गत खाजगी जमिनीवर अस्तित्वात असलेल्या दलित वस्तीच्या ठिकाणी शासनाच्या योजना लागू आहेत, असे समितीच्या निदर्शनास आले आहे व त्या योजनांच्या आधारे खाजगी जमिनीवरील दलित वस्तीच्या ठिकाणी शासनाच्या योजनांची कामे घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. सबब, ५७ लाभार्थ्यांना खाजगी जमिनीवर असलेल्या झोपड्यांच्या ठिकाणी शासनाच्या योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी तसेच उर्वरित २६३ लाभार्थ्यांना रमाई घरकुल आवास योजनेचा लाभ तात्काळ मिळण्याच्या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

ठाणे महानगरपालिका

(१) ठाणे महानगरपालिकेच्या आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमावली अंतिम करून मंजूरी मिळविण्याबाबत—

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक ५ जुलै २०१७ रोजी ठाणे महानगरपालिका या कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीच्या वेळी ठाणे महानगरपालिकेच्या आकृतीबंधास व सेवाप्रवेश नियमांना मान्यता घेण्याबाबत समितीने विचारणा केली असता आयुक्त, महानगरपालिका यांनी सेवाप्रवेश नियमावली शासनाकडे दिनांक १ ऑगस्ट २०१६ रोजी सादर केली आहे. या संदर्भात पाठपुरावा सुरू असून शासनाकडे बैठका घेण्यात येत आहे. समितीने निर्देश दिल्यानुसार सेवाप्रवेश नियमावली वेळेत पूर्ण करण्यात येईल.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीने महानगरपालिकेकडून आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमावली अंतिम करण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर २०१६ नंतर कोणती कार्यवाही केली आहे याबाबत विचारणा केली

असता, शासनाकडे महापालिकेचा आकृतीबंध प्राप्त झाला असून त्यानुसार सेवा प्रवेश नियम, किती पदे व्यपगत करायची व किती पदे नव्याने भरावयाची याबाबत नव्याने आकृतीबंध तयार करून व विभागीय सचिव स्तरावर बैठक घेऊन दोन महिन्यांमध्ये कार्यवाही करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

ठाणे महानगरपालिकेच्या आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमावलीस शासनाकडून मंजुरी मिळालेली आहे. सबब, समितीला दिलेल्या आश्वासनांनुसार महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आकृतीबंधानुसार शासन स्तरावर बैठक घेऊन रिक्त असलेली व नव्याने निर्माण झालेली पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(२) उप अभियंता (नागरी) या संवर्गातील पदोन्नतीने रिक्त असलेले पद :

समितीला जिल्हा बैठकीच्या वेळी कनिष्ठ अभियंता या संवर्गातून उपअभियंता (नागरी) या संवर्गातील १ पद पदोन्नतीने केव्हापासून रिक्त आहे असे समितीने विचारणा केली असता आयुक्त, महानगरपालिका यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, यासंदर्भातील प्रकरण मा. न्यायालयात असून त्यामुळे पदोन्नती देण्यात आलेली नाही. मा. न्यायालयाने प्रथमतः उप अभियंता (नागरी) यांची सेवाज्येष्ठता निश्चित करावी व त्यानंतर पदोन्नती द्यावी असे महापालिकेकडून कळविण्यात आले. तसेच त्यासाठी महानगरपालिकेला प्रारूप यादी प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेल्या सूचनान्वये सुनावणी घेतल्यानंतर उप अभियंता (नागरी) या पदावर पदोन्नतीसाठी १० ते १५ दिवसांचा कालावधी लागेल, असे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने उप अभियंता (नागरी) या संवर्गातील सेवा ज्येष्ठता नुसार सुनावणीचे काम पूर्ण झाले असून अंतिम निर्णय अपेक्षित आहे. या संवर्गातील सेवा ज्येष्ठता यादी दिनांक ५ ऑक्टोबर २०१७ अन्वये अंतिम करण्यात आली आहे. सेवा ज्येष्ठतेचा प्रश्न सुटल्यानंतर एक ते दीड महिन्यामध्ये पदोन्नती देणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे उपायुक्त महानगरपालिका ठाणे यांनी समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

कनिष्ठ अभियंता (नागरी) या संवर्गातून पदोन्नतीने उप अभियंता (नागरी) या संवर्गातील पद रिक्त असून सेवा ज्येष्ठतेनुसार संबंधित कर्मचा-यांची सुनावणी घेऊन कर्मचा-याला उप अभियंता (नागरी) या संवर्गात पदोन्नती देण्याचा निर्णय दोन महिन्यांत घेण्यात येणार आहे. सबब, महानगरपालिकेने घेतलेल्या अंतिम निर्णयान्वये पदोन्नतीने रिक्त असलेले एक पद भरण्यात आल्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(३) महापालिकेतील वर्ग 'क' व 'ड' या संवर्गाची बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करणे व रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :—

जिल्हा बैठकीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने महापालिकेतील वर्ग 'क' व 'ड' संवर्गाची बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी केव्हा करण्यात आली आहे, अशी समितीने विचारणा केली असता उपायुक्त, महानगरपालिका यांनी बिंदूनामावली नोंदवही तपासणीसाठी सन २०१३ मध्ये मागासवर्ग कक्षाकडे सादर करण्यात आली होती. त्यात मागासवर्ग कक्षाने परराज्यातील अनुसूचित जातीचे उमेदवाराबाबत त्रुटी काढल्यामुळे या सर्व कर्मचा-यांचा खुल्या प्रवर्गात समावेश करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व महानगरपालिकेने मागासवर्ग कक्षाने केलेल्या सूचनान्वये कार्यवाही करावी असे सूचित केले आहे. तसेच महानगरपालिकेतील सर्व विभागनिहाय कार्यरत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील पदांचा अनुशेष भरतांना बिंदूनामावली नोंदवही तपासण्याची कार्यवाही एक महिन्याच्या आत करण्यात येईल व त्याप्रमाणे रिक्त झालेली पदे भरण्यात येतील असे आयुक्त, महानगरपालिका यांनी समितीला आश्वासित केले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी महापालिकेने नवीन आकृतीबंधामध्ये ६ हजार १६८ नवीन पदांची मागणी केली असून त्यात विविध संवर्गातील ७०१ पदे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असून आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमांस शासनाची मंजुरी मिळताच कार्यवाही करण्यात येईल. वर्ग 'अ' ते 'ड' संवर्गात पदोन्नतीने एकूण २७ तांत्रिक पदांचा अनुशेष असून त्यात एक पद अतिरिक्त ठरलेले आहे. तसेच समितीच्या दौ-यानंतर २०९ पदांपैकी ४२ पदे अनुसूचित जाती प्रवर्गातील भरण्यात आली आहेत. पदोन्नतीने भरावयाच्या संवर्गनिहाय एकूण १५८ पदांपैकी ५२ पदे अनुसूचित जातीकरिता आरक्षित आहेत, ही पदे विभागीय पदोन्नती समिती (डी.पी.सी.) स्तरावर दीड ते दोन महिन्यांत प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्यात येईल, असे आयुक्त, महानगरपालिका यांनी समितीस आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

महानगरपालिकेतील विभागनिहाय संवर्गाची बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी एक महिन्याच्या आत पूर्ण करून अनुसूचित जाती प्रवर्गातील अनुशेष भरण्याची कार्यवाही करण्यात यावी तसेच नवीन आकृतीबंधास प्राप्त झालेल्या मंजुरी नंतर विविध संवर्गनिहाय अनुसूचित जाती प्रवर्गातील ७०१ पदे व पदोन्नतीच्या संवर्गातील अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेली ५२ पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर

(१) अनवली व आळुवाडी (जि.सोलापूर) येथे शासकीय निवासी शाळेचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत :

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक २२ जून २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीत अनुसूचित जाती व नवबौध्द मुला- मुलींसाठी मंजूर ३ शासकीय निवासी शाळांपैकी एकच निवासी शाळा सुरू असल्याबाबत समितीने विचारणा केली असता सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी पंढरपूर, मोहोळ व अक्कलकोट तालुक्यामध्ये ३ निवासी शाळा मंजूर आहेत. अक्कलकोट येथे ७५ विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळेची इमारत तयार असून अंतर्गत दुरुस्तीची कामे करणे बाकी आहे. तसेच पिंपरी येथील निवासी शाळेसाठी जागा उपलब्ध झाली असून तेथे इमारत बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच अनवली येथील निवासी शाळेच्या जागा व बांधकामासंदर्भात ९ कोटी १९ लाख रुपयांचे अंदाजपत्रक शासनाकडे सादर केले आहे. एक निवासी शाळा माहे जून, २०१७ मध्ये हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच सोलापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह आणि पंढरपूर येथील संत गाडगे महाराज वसतिगृहाचे अनुदान सुरू करण्याबाबतचे आदेश प्राप्त असून दोन्ही वसतिगृह सुरू करण्यात येत आहेत, अशी माहिती सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीस दिली.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीत समितीने अनवली व आळुवाडी जि. सोलापूर येथील शासकीय निवासी शाळेचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत विचारणा केली असता अनवली (जि.सोलापूर) येथे शासकीय निवासी शाळेसाठी जागा उपलब्ध असून सन २००६ च्या जुन्या डी. एस. आर. नुसार अंदाजित

रक्कम ४.४२ कोटी रुपये एवढी होती. त्यानंतर सन २०१० मध्ये डी. एस. आर. बदलल्यामुळे ९ कोटी १९ लाख रुपयाचे अंदाजपत्रक झाले असून सद्यःस्थितीत निवासी शाळेचे बांधकाम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले आहे. यापूर्वीची उपलब्ध रक्कम कमी असल्याकारणाने तसेच सुधारित अंदाजपत्रक ९ कोटी १९ लाख रुपयाचे झाल्यामुळे प्रस्ताव पुनश्चः सहायक आयुक्त, उप आयुक्त यांचेकडे दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी पाठविण्यात आला व त्यानंतर उच्चस्तरीय सचिव समितीकडून वाढीव अंदाजपत्रकातील फरकाची रक्कम मंजूर करून घ्यावी लागली तसेच यापूर्वी जी+२ च्या प्रस्तावानुसार एकाच इमारतीत शासकीय निवासी शाळा, मुलींसाठी व मुलांसाठी वसतिगृह यांचा समावेश होता परंतू अमरावती येथील वास्तुशास्त्रज्ञ यांच्या प्लॅननुसार त्यात बदल होऊन तीन वेगवेगळ्या इमारतीचे प्लान तयार करून नविन डी. एस. आर.देखील घेण्यात आला. त्यामुळे अंदाजित रकमेमध्ये वाढ झाली आहे. तसेच जी + ३ च्या आराखड्यास दिनांक १७ फेब्रुवारी २००७ रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असून त्रुट्यांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे विशेष कॅम्प सुरू करण्यात आला आहे, असे सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर यांनी समितीस सांगितले. तसेच समितीने आळुवाडी, जि. सोलापूर येथील बांधकामाच्या सद्यःस्थितीबाबत विचारणा केली असता तेथील ७५ टक्के काम पूर्ण झाले असून उच्चस्तरीय समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला सुचविलेल्या त्रुट्यांची पूर्तता करून दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे पाठविण्यात आला आहे. समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळा, वसतिगृहे यांचे बांधकाम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहत असल्यामुळे समितीने बांधकाम भवन येथील सर्व आर्किटेक्ट व सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व अधिका-यांना एकत्र बोलावून समाजकल्याण विभागाच्या अखत्यारीतील निवासी शाळा व वसतिगृहांच्या संबंधातील त्रुट्यांची पुर्तता जलदगतीने सोडवून व प्रस्तावास मान्यता देऊन लवकरात लवकर उच्चाधिकार समितीकडे प्रस्ताव दाखल करावेत, असे समितीने सहायक आयुक्त, समाजकल्याण सोलापूर यांना निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

अनवली व आळूवाडी, जि. सोलापूर येथील निवासी शाळेच्या बांधकामास सन २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही प्रस्तावित निवासी शाळेच्या बांधकामास १० ते १२ वर्षांचा विलंब झालेला आहे. सबब, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ यांच्या समवेत प्रस्तावातील त्रुट्या दूर करण्यासंदर्भात तातडीने बैठक आयोजित करून

निवासी शाळेचे बांधकाम जलदगतीने पूर्ण करून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तातडीने सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(२) अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील विकासासाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाअंतर्गत उमेदवारांना देण्यात येणारे प्रशिक्षण :

जिल्हा बैठकीच्या वेळी सन २०१२ ते मार्च, २०१६ अखेरपर्यंत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांसाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत १६९ मुले व ४ मुली अशा एकूण १७३ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात आला आहे, अशी समितीने विचारणा केली असता सोलापूर जिल्ह्यात विविध प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत, अनेक विद्यार्थी त्या संस्थांमध्ये प्रशिक्षण घेतात. काही सामाजिक संस्था सुद्धा प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवितात. त्या माध्यमातून व्यायामाचे प्रशिक्षण आणि प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचे काम केले जाते. सन २०१७ मध्ये सदरहू प्रशिक्षणाच्या बाबतीत जाहिरात देण्यात आली असून सामाजिक न्याय विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. सन २०१७-१८ या वर्षात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ मिळेल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील असे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी समितीला सांगितले.

दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदरहू साक्षीच्या बैठकीच्या वेळी अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील युवकांसाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाअंतर्गत उमेदवारांना देण्यात येणा-या प्रशिक्षणाबाबत समितीने विचारणा केली असता सन २०१७ मध्ये जिल्ह्यातून ३७ उमेदवारांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच अमरावती जिल्हा दूर असल्यामुळे तेथे प्रशिक्षणासाठी येण्यासाठी प्रवासी भाडे दिले जात नसल्याने कमी उमेदवार येतात. तसेच जिल्हानिहाय खाजगी संस्थाना आवश्यक मान्यता देऊन पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहेत. अशा केंद्रामध्ये मागासवर्गीय उमेदवारांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत समितीने दिलेल्या निर्देशानुसार सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर यांनी समितीला असे आश्वासित केले की जाहिरात प्रसिद्ध करून मान्यताप्राप्त संस्थांचे प्रस्ताव मागवून यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांसाठी शासनाकडून देण्यात येणा-या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाचे कार्यक्रम जिल्ह्यापासून खुप दूर असल्याकारणाने उमेदवारांना प्रवास करून येणे-जाणे त्रासाचे होते. तसेच या उमेदवारांना प्रशिक्षण कार्यक्रमापर्यंत येण्या-जाण्याचे भाडेही देण्यात येत नाही, असे समितीच्या निदर्शनास आले. सबब, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्ह्यानिहाय खाजगी संस्थांना आवश्यक ती मान्यता देऊन पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.

उक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

सहायक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे

(१) विभागीय स्तरावर २५० विद्यार्थी क्षमता असलेली ३ वसतिगृहे मुलांसाठी व १ वसतिगृह मुलींसाठी अशा ४ वसतिगृहांच्या प्रलंबित बांधकामाबाबत :

अनुसूचित जाती कल्याण समितीची दिनांक ६ जुलै २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीत विभागीय स्तरावर मागासवर्गीयांसाठी १००० विद्यार्थ्यांचे वसतिगृह अद्यापपर्यंत तयार केलेले नाही, याबाबत पाठपुरावा केला आहे काय ? तसेच ठाणे जिल्हा विभागीय स्तरावरील २५० मुलींची क्षमता असलेल्या वसतिगृहाची सद्य:स्थिती काय आहे, यासाठी शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव, समाजकल्याण यांनी समितीला असे विशद केले की, विभागीय स्तरावर मागासवर्गीयांसाठी १००० विद्यार्थ्यांचे वसतिगृह अद्यापपर्यंत तयार नाही. मुंबई उपनगर जिल्ह्यातील भिक्षेकरी गृह, चेंबूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील बांधकाम बीओटी तत्वावर देण्यात आले आहे. तेथे दोन वसतिगृह बांधण्यात येणार आहेत. त्यामध्ये ७५० मुलांची क्षमता व २५० मुलींची क्षमता असलेली वसतिगृहे बांधण्याची शिफारस विभागाकडे करण्यात आली आहे. या बांधकामासाठी १८१५१ चौरस मीटर वसतीगृहाचे बांधकाम मुलांसाठी व ६०७८ चौरस मीटर वसतिगृहाचे बांधकाम मुलींसाठी करण्याचे प्रस्तावित केले आहे व सन २००९ मध्ये या कामाचे भुमिपूजन झाले आहे. परंतु अद्यापही बांधकाम करण्यास सुरुवात झालेली नाही. बांधकाम विभागाकडून सदर काम होणार असल्याने व या विभागाचे नियंत्रण असल्याने बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी वसतिगृहाचे बांधकाम वेळेत केलेले नाही. तसेच ठाणे जिल्ह्यासाठी सिडकोने १००० चौरस मीटर जागा देण्याचे पूर्वी मान्य केले होते. या जागेसाठी शासनाने बजेट मंजूर केल्यानूसार सिडकोला ५% रकमेचा ॲडव्हॉन्स

पेमेंट धनादेशाद्वारे सन २००७ मध्ये दिला आहे. सिडकोनी त्यावेळी तो धनादेश स्वीकारला होता. परंतु काही कारणास्तव ती जागा देता येणार नसल्याचे सिडकोकडून लेखी पत्रान्वये १० वर्षांच्या विलंबाने सन २०१७ मध्ये कळविण्यात आले आहे. परंतु आता सदर जागा न देता घणसोली येथील जागा देण्याचे मान्य केले आहे. अद्यापही ती जागा मिळालेली नाही. विभागाकडून २५० मुलींचे वसतिगृह बांधण्यासाठी सिडकोने जागा निश्चित करून दिल्यानंतर तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. सद्यस्थितीत घणसोली येथील मागणी केलेल्या जागेला सिडकोने मंजुरी दिली असून सिडकोकडून मंजुरी पत्र प्राप्त झाल्यानंतर रक्कम भरण्यात येईल, असे सहायक आयुक्त, समाजकल्याण ठाणे यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने सिडकोकडून जागा वितरणास १० वर्षांचा विलंब झाल्यामुळे यात दिरंगाई करणा-या, जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असे निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विभागीयस्तरावर २५० विद्यार्थी क्षमता असलेली ३ वसतिगृहे मुलांसाठी व १ वसतिगृह मुलींसाठी अशा ४ वसतिगृहांच्या प्रलंबित बांधकामाबाबत विचारणा केली असता, सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यानी समितीला असे विशद केले की, चेंबूर येथे १ हजार मुलांची क्षमता असलेल्या वसतिगृहांपैकी २५० मुलींची क्षमता असलेल्या वसतिगृहाचे बांधकाम सुरू असून दुस-या मजल्यापर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. वसतिगृहाच्या तिस-या मजल्याचे बांधकाम सुरू आहे. तसेच ७५० मुलांची क्षमता असलेल्या वसतिगृहाच्या पायाचे खोदकाम झाले आहे. सदर काम दिनांक १ जून, २००६ रोजी मंजूर झाले असून सदरची जागा ही महिला व बाल कल्याण विभागाची असल्याने या जागेत समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाबरोबर महिला व बाल कल्याण विभागाची इमारत व आयटीआयच्या इमारतीचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. या संपूर्ण जागेचा विकास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत एकत्रितपणे करण्यात येत असून समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहाचे बांधकाम हा त्यातील एक भाग आहे. या सर्वांचे नियोजन करण्यासाठी विलंब झालेला आहे. तसेच या कामाच्या अंदाजपत्रकात बदल झाला असून मुख्य सचिव अध्यक्ष असलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीसमोर हा प्रस्ताव पुनश्चः सादर करण्यात आला. समितीने जिल्ह्यातील लोकसंख्येनुसार या सोईसुविधा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मिळणे बंधनकारक असतानाही १० ते १२ वर्षांचा विलंब होत असून यास बांधकाम विभाग जबाबदार असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देश दिले.

घणसोली, नवी मुंबई येथील सिडकोच्या मालकीच्या जागेवर २५० मुलींचे वसतिगृह उभारण्याच्या कामाबाबत समितीने विचारणा केली असता नवी मुंबई, ठाणे जिल्ह्यांतील २५० मुलींचे असलेले विभागस्तरावरील वसतिगृहासाठी सिडकोच्या मालकीची घणसोली, नवी मुंबई येथील १०० चौरस मीटर जागा आरक्षित केली असून दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी सिडकोकडे भूखंडाची मागणी केली होती. सिडकोने भूखंडाची १० टक्के रक्कम भरण्याबाबत कळविल्यानुसार पत्र क्रमांक १७७९, दिनांक १२ जुलै २०१८ रोजी नुसार रुपये १,२५,७४,७६४ चा धनादेश सिडकोला देण्यात आला. मात्र सिडकोच्या संचालक मंडळाने भूखंड वाटपात बदल करून दिनांक २४ नोव्हेंबर २०१६ नुसार वसतिगृहासाठी ऐरोलीच्या भूखंडाऐवजी घणसोलीचा भूखंड मंजूर केला. घणसोलीच्या भूखंडासंदर्भात सिडकोनी १० टक्के रक्कम न स्वीकारता त्याऐवजी १०० टक्के रक्कम भरण्यात यावी, असे समाजकल्याण विभागास कळविले परंतू सिडकोकडून भूखंडाची संपूर्ण रक्कम (Exact cost) निश्चित केली नसल्याने सिडकोकडून जागा मिळण्याबाबत विलंब होत आहे, असे सहायक आयुक्त समाजकल्याण, ठाणे यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने अनुसूचित जाती प्रवर्गातील मुलींच्या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत होत असलेल्या जाणीवपूर्वक विलंबाबाबत तातडीने कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्यात यावा, असे सहायक आयुक्त समाजकल्याण, ठाणे यांना निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

मुंबई उपनगर जिल्ह्यातील चेंबूर भिक्षेकरी गृह येथे बांधा-वापरा-हस्तांतरित करा (B.O.T) या तत्त्वावर ७५० मुलांची क्षमता असलेले व २५० मुलींची क्षमता असलेल्या वसतीगृहाच्या बांधकामास सन २००९ मध्ये मंजुरी मिळालेली असताना १० वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर अद्यापही वसतिगृहाचे बांधकाम प्रलंबित असल्याने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनेक सोई सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

घणसोली, नवी मुंबई येथील २५० मुलींचे वसतिगृह उभारण्याच्या कामास सिडकोकडून वारंवार जमीन वितरणामध्ये बदल करणे, जागेची मूळ रक्कम निश्चित न करणे, सिडकोकडे समाजकल्याण विभागाकडून १,२५,७४,७६४ रुपयांचा धनादेश भरण्यात येऊनही तो सिडकोने पुन्हा परत करणे या कारणांमुळे समाजकल्याण विभागास जागा मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे नवी मुंबई परिसरातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधापासून वंचित राहावे लागत आहे. सबब, घणसोली नवी मुंबई

येथील २५० मुलींची क्षमता असलेल्या वसतिगृहासाठी तातडीने जागा वाटप करण्याची कार्यवाही करण्यात यावी तसेच चेंबूर भिक्षेकरी गृह प्रस्तावित वसतिगृहाच्या बांधकामास व घणसोली, नवी मुंबई येथील जागा वाटपास विलंब करणा-या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(२) सन २०१४ ते २०१७ या कालावधीत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता राबविण्यात येणा-या योजना :—

जिल्हा बैठकीच्या वेळी सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता राबविण्यात येणा-या योजनेसाठी सन २०१४ ते २०१७ या कालावधीत किती निधी प्राप्त झाला आहे, प्राप्त निधीतून कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत, अशी समितीने विचारणा केली असता, अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ९० कोटी ८४ लाख रुपये प्राप्त झाले होते. त्यांपैकी ९० कोटी ५१ लाख रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१५-१६ मध्ये ८७ कोटी १९ लाख रुपये प्राप्त झाले होते. त्यांपैकी ७७.७४ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सन २०१६-१७ मध्ये ६२ कोटी २० लाख रुपये प्राप्त झाले होते. त्यातील संपूर्ण निधी खर्च झालेला आहे, अशी माहिती सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी समितीस दिली. वर्षनिहाय उपरोक्त झालेल्या खर्चात सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी योजनानिहाय केलेल्या कामांची माहिती सादर करावी, असे समितीने निर्देश दिले.

दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी झालेल्या बैठकीत समितीने सन २०१४ ते २०१७ या कालावधीत अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांसाठी विभागामार्फत कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत, योजनानिहाय कामांची माहिती देण्यात यावी, अशी विचारणा केली असता सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी समितीस असे विशद केले की, सन २०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद ९१ कोटी रुपये होती, मार्च अखेर ८७ कोटी रुपये प्राप्त झाली आणि त्यातून ७७ कोटी रुपये खर्च झाली आहे. सन २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद ६२ कोटी रुपये होती, मार्च अखेर ६२ कोटी रुपये निधी प्राप्त झाला होता मार्च अखेर पर्यंत १०० टक्के निधी खर्च झाला आहे. सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद ७० कोटी रुपये होती, संपूर्ण निधी प्राप्त झाल्यानुसार खर्च झाला आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात ग्रामीण भागातील विहिरींच्या विद्युतीकरणासाठी सामाजिक न्याय विभागाच्या योजनेतून निधी दिला जात असून ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भाग

असून काही भागांत रस्तेसद्धा उपलब्ध नाहीत. तरीही विद्युत विभागाने त्या भागातील शेतक-यांच्या विहिरींचे विद्युतीकरण न केल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांवर अन्याय झाला आहे. अधीक्षक अभियंता (विद्युत) यांनी ८ लाख रुपयांची मागणी केली होती. परंतु निधीची आवश्यकता नसल्यामुळे त्यांनी ८ लाख रुपये तरतूद समर्पित केली. लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती क्षेत्रात विद्युत विभागाने ३० लाख रुपयांची मागणी करणे अपेक्षित असताना केवळ ३ लाख रुपयांची मागणी करणे हेचं चुकीचे आहे तसेच विद्युत विभागास ८ लाख रुपये निधी प्राप्त झालेला असताना सदर निधी खर्च न करता तो परत पाठविणे योग्य नाही याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

अभिप्राय व शिफारशी :

अधीक्षक अभियंता (विद्युत) यांचेकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या विकासासाठी ८ लाख रुपये निधी प्राप्त झालेला असतांना त्या रकमेचा कोणताही वापर न करता संपूर्ण निधी समर्पित केल्याने समितीने तीव्र नापंसती व्यक्त केली आहे. सबब, ठाणे जिल्ह्यात मोठया प्रमाणात ग्रामीण भाग असून त्या भागातील शेतक-यांच्या विहिरींसाठी प्राप्त झालेल्या निधीतून विद्युतीकरण न केल्यामुळे अधिक्षक अभियंता (विद्युत) व संबंधित जबाबदार असणा-या अधिका-यांविरुद्ध कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-एक

जिल्हाधिकारी सोलापूर व जिल्हापरिषद ठाणे कार्यालय यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती

प्रपत्र-'अ'

जिल्हाधिकारी सोलापूर बैठकीचे वेळी प्राप्त झालेली माहिती

(ब) सदर मंजूर पदांपैकी वर्ग १ ते ४ या संवर्गात अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांची संवर्गनिहाय माहिती देण्यात यावी ? राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी माहे मे, २०१७ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती पदे रिक्त आहेत ? पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत.

अ. क्र.	संवर्ग	मंजूर पदे	कार्यरत पदे	अनुसूचित जातीसाठी राखीव असलेली पदे	त्यापैकी भरलेली पदे	शिल्लक अनुशेष	पदे रिक्त राहण्याची कारणे	शेरा
१.	उपजिल्हाधिकारी	१७	१३				नियुक्ती प्राधिकारी शासन आहे.	
२.	तहसिलदार	२२	१७					
३.	नायब तहसिलदार	६०	३६					
४.	लघुलेखक (उच्च श्रेणी)	०१	००				नियुक्ती प्राधिकारी म.विभागीय आयुक्त आहेत.	
५.	लघुलेखक (निम्नश्रेणी)	०८	०४					
६.	लघुटंकलेखक	०४	०२					
७.	लिपीक टंकलेखक (सरळ सेवा ७५%)	२३४	२४५	३०	३५	+५		
	लिपीक टंकलेखक (शिपाई संवर्गातून पदोन्नती २५%)	७८		१०	०२	-०८	शिपाईमधून लिपीक संवर्गात पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त आणि इच्छुक कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरची पदे रिक्त आहेत.	सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०८/०७/२००८ नुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील ०५ पदे सरळसेवेने भरण्यात आली आहेत. दि.३१/०३/२०१७ रोजी लिपीक संवर्गातून अवनत करून संवर्गात पदोन्नती दिलेले ०३ लिपीकाची पदे रिक्त झाली आहेत तथापि सन २०१७ मध्ये शासनाकडून लिपीक भरती करण्याबाबत आदेश प्राप्त नसलेने ०३ पदे रिक्त आहेत.
८.	अवनत करून	२०८	२०७	२७	३३	+६		

९.	तलाठी	५५६	४८०	७२	६९	-०३	पदोन्नती-१, राजीनामा-२ या कारणांमुळे सदरची पदे रिक्त झाली आहेत.	दि.२९/९/१६ व दि.१४/१०/२०१६ रोजी राजिनाम्याने ०२ पदे व माहे मार्च २०१७ मध्ये तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीने एक पद असे एकुण ०३ पदे रिक्त झालेली आहेत. तथापि सन २०१७ मध्ये भरती प्रक्रिया करणेस शासनाकडून आदेश प्राप्त नसलेने सदरची पदे रिक्त आहेत.
१०.	मंडळ अधिकारी	९८	९०	१२	१४	+२		
११.	वाहन चालक	२४	२३	०३	०४	+१		
१२.	शिपाई	२१४	१५४	२८	२९	+१		
१३.	पहारेकरी	०३	०३	०१	०१	०		
	एकूण	१५२७	१२७४	१८३	१८७			

प्रपत्र-'ब'

जिल्हा परिषद ठाणे साक्षीचे वेळी प्राप्त झालेली माहिती

अ.क्र.	कार्यवृत्ताचे पृष्ठ क्रमांक	समितीला दिलेले आश्वासन/आश्वासित मुद्दे	आश्वासन पूर्ततेबाबत केलेली कार्यवाही.
		२. सद्यस्थितीत अनुसूचित जातीची किती पदे रिक्त आहेत ? अनुसूचित जातीची रिक्त पदे भरण्याकरीता काय कार्यवाही करण्यात येत आहे?	२. अनु.जातीच्याअनुशेषाच्या सध्यस्थितीबाबत वरील माहिती ठाणे / पालघर कर्मचारी समायोजनाबाबत ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक २२ जुलै २०१६ नुसार काढण्यात आली होती. २) तथापि ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ३१ जुलै २०१७ अन्वये दि. २२ जुलै २०१६ चा शासन निर्णय रद्द केल्याने व २९ फेब्रु.२०१६ च्या शासन निर्णयान्वये समायोजन कार्यवाही करावी लागल्याने शासन निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व ठाणे व पालघर दोन्ही जिल्ह्यात समान रिक्त पदे राहतील याप्रमाणे सदर समायोजन बिंदुनामावलीनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी पूर्ण करण्यात आले असून त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील सध्यस्थितीत अनु.जातीच्या उमेदवारांचे विभागनिहाय अनुशेष पुढीलप्रमाणे आहेत. दिनांक ३१ जुलै २०१७ च्या समायोजनाच्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी नंतर

अ.क्र.	विभाग	पद	अनुशेष	एकूण
१	सा.प्रवि	क.प्र.अ. पदोन्नती	१	
		लघुलेखक नि.श्रे. पदोन्नती	१	
		वाहनचालक पदोन्नती	३	
		हवालदार पदोन्नती	१	
		परिचर	१२	१८
२	ग्रामपंचायत	ग्रामिण स्पर्धा	१	
		ग्रामसेवक सरळसेवा	१६	१७
३	अर्थ	स.ले.अ. पदोन्नती	२	
		क.ले.अ. सरळसेवा	१	

अ.क्र.	कार्यवृत्ताचे पृष्ठ क्रमांक	समितीला दिलेले आश्वासन/आश्वासित मुद्दे	आश्वासन पुर्ततेबाबत केलेली कार्यवाही.				
					क.सहा.लेखा सरळसेवा	३	
					क.सहा. लेखा पदोन्नती	२	८
			४	बांधकाम	निरंक	निरंक	निरंक
			५	आरोग्य	आरोग्य सेवक महिला सरळसेवा	१	
					आरोग्य पर्यवेक्षक पदोन्नती	१	२
			६	कृषी	विस्तार अधिकारी कृषी पदोन्नती	१	१
			७	प्रापापू	कनिष्ठ अभियंता पदोन्नती	१	
					वायु संपीडक चालक सरळसेवा	१	
					जॅक हॅमर ड्रिलर स.सेवा	१	
					सहा.आवेदक सरळसेवा	१	४
			८	लघुपाटबंधारे	निरंक	निरंक	निरंक
			९	पशुसंवर्धन	पशु.पर्यवेक्षक सरळसेवा	१	
					पशु.पर्यवेक्षक पदोन्नती	१	
					सहा.पशुधन विकास अधिकारी पदोन्नती	१	
					व्रणोपचारक पदोन्नती	२	५
			१०	महिला व बाल विकास	पर्यवेक्षिका(मुख्य सेविका) सरळसेवा	१	
					पर्यवेक्षिका(मुख्य सेविका) निवडीने	२	३

अ.क्र.	कार्यवृत्ताचे पृष्ठ क्रमांक	समितीला दिलेले आश्वासन/आश्वासित मुद्दे	आश्वासन पुर्ततेबाबत केलेली कार्यवाही.

११	शिक्षण	विस्तार अधि. श्रेणी २ वर्ग- ३	३	
		विस्तार अधि. श्रेणी ३ वर्ग- ३	१	
		प्राथ.शिक्षक सरळसेवा	५९	६३
				१२१

वरील एकूण १२१ अनुशेषापैकी सरळसेवा — १०४ व पदोन्नती — १७ असा अनु.जातीचा अनुषेश आहे. (प्राथमिक शिक्षक-५९ व उर्वरीत विभाग जाहिरातीद्वारे भरावयाची ४५ व पदोन्नतीने १७)

१. दिनांक ३१ जुलै २०१७ च्या ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णयानुसार ठाणे / पालघर मधील कर्मचा-यांचे समायोजन दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ अखेर पुर्ण करण्यात आले असून जिल्हा परिषद ठाणे मधील ११ विभागांतील अनु.जातीची एकूण १२१ पदे रिक्त असून पैकी १० ४ पदे सरळसेवेची व १ ७ पदे पदोन्नतीची आहेत.

२. सरळसेवा १० ४ अनु.जातीच्या रिक्त पदांपैकी ५९ पदे प्राथ. शिक्षकांची असून सदर पदे महाराष्ट्र शिक्षण परिक्षा परिषदेकडून शिक्षण विभागाच्या संमतीने TET परिक्षा पास असणा-या उमेदवारांची मागणी करुन भरण्यात येतील. व उर्वरीत इतर विभागांची अनु.जातीची ४ ५ रिक्त पदे जाहिरातीने ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय **दिनांक २४ ऑगस्ट २०१७** नुसार ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतील. याबाबत ग्रामविकास विभागाकडील पत्र **दिनांक १६ मार्च २०१८** नुसार

परिशिष्ट - दोन

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० जून २०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(७) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(८) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

(१) डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी
(२) डॉ. प्रविणकुमार देवरे, अपर जिल्हाधिकारी
(३) श्री. अजित रेवेकर, निवासी उप जिल्हाधिकारी
(४) श्रीमती रेश्मा माळी, उप जिल्हाधिकारी (महसूल)

सदरहू बैठकीत समितीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेंबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० जून २०१७ रोजी १२.०० वाजता जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(७) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(८) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

(१) डॉ. राजेंद्र भारूड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
(२) श्री. पी. व्ही. बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.
(३) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र).
(४) श्री. डि. एम. गिरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी.
(५) श्री. गौ.ल.जगदाळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
(६) श्रीमती सुलभा वटारे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक).
(७) डॉ. एस.डी.जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी.
(८) श्री. ए.जी.नवाले, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
(९) श्री. रूपेश नाळे, अतिरिक्त कार्यभार मागासवर्ग कक्ष.

सदरहू बैठकीत समितीने सोलापूर, जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेंबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० जून २०१७ रोजी महानगरपालिका कार्यालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(७) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(८) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :—

(१) श्री. अविनाश ढाकणे, आयुक्त
(२) श्री. श्रीकांत मायकलवार, उपायुक्त
(३) श्री. अभिजीत हुराळे, सहायक आयुक्त
(४) श्री. लक्ष्मण चलवादी, नगर अभियंता
(५) श्री. मुकूंद भालेराव, सार्वजनिक आरोग्य अधिकारी
(६) श्री. दत्तात्रय लोंढे, मुख्यलेखापाल
(७) श्री. रुपेश नाळे, अतिरिक्त कार्यभार मागासवर्ग कक्ष.

सदरहू बैठकीत समितीने सोलापूर महानगरपालिका कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जातपडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेंबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

चौथी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० जून २०१७ रोजी रात्री जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर यांच्याकडून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत बैठक आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(७) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(८) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. अनिल शेंदारकर, सदस्य जातपडताळणी समिती.
(२) श्री. एन. आर. चौगुले, सहायक आयुक्त, समाजकल्याण तथा संशोधन अधिकारी, जातप्रमाणपत्र पडताळणी समिती.
(३) श्री. रुपेश नाळे, अतिरिक्त कार्यभार मागासवर्ग कक्ष.
(४) श्रीमती सी. एन. गाडेकर, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. प. सोलापूर.

सदरहू बैठकीत समितीने सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर या कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जातपडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेंबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

पाचवी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक ५ व ६ जुलै २०१७ रोजी ठाणे जिल्ह्याचा दौरा आयोजित केला होता. समितीने बुधवार दिनांक ५ जुलै २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथे बैठक आयोजित केली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.
(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर वि.प.स.
(८) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(९) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
(२) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. विवेक भिमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे
(२) श्री. चंद्रकांत यादव पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
(३) श्रीमती मानसी बोरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(४) श्री. आर. टी. प्रभाकर, कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे)
(५) श्री. पी. आय. सुखदेवे, कार्यकारी अभियंता, बांधकाम
(६) श्री. रविकिरण पाटील, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(७) श्रीमती गीता नी. नागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(८) डॉ. बी. एस. सोनावणे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(९) श्रीमती मीना शेंडकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१०) श्रीमती वर्षा लड्डा उंटवाल, सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, कोकण विभाग.

सदरहू बैठकीत समितीने ठाणे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जातपडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

सहावी बैठक

समितीची बैठक दिनांक ५ जुलै २०१७ रोजी दुपारी ३-०० वाजता महानगरपालिका, ठाणे येथे आयोजित केली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) श्री. इम्तीयाज सय्यद, वि.स.स.
(७) श्री, विजय ऊर्फ भाई गिरकर वि.प.स.
(८) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(९) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(२) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. समीर उन्हाळे, उपायुक्त
(२) श्री. संजय निपाने, उपायुक्त (साप्र)
(३) श्री. ओमप्रकाश दिवरे, उपायुक्त
(४) श्री. यु. व्ही. सपकाळे, सहायक आयुक्त, समाजकल्याण
(५) श्रीमती वर्षा लड्डा उंटवाल, सहायक आयुक्त मागासवर्गीय कक्ष, कोकण विभाग
(६) श्री. रतन अवसरभोळ, नगर अभियंता
(७) श्री. सुधीर नाकाडी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

सदरहू बैठकीत समितीने महानगरपालिका ठाणे, या कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जातपडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेंबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

सातवी बैठक

समितीची बैठक दिनांक ६ जुलै २०१७ रोजी दुपारी १-०० वाजता सहायक आयुक्त, समाजकल्याण, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे आयोजित केली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.
(६) श्री. इम्तीयाज सय्यद, वि.स.स.
(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(८) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.
(९) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
(२) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. बी. ए. सोळंकी, उपायुक्त, जात पडताळणी समिती, ठाणे.
(२) श्रीमती यू. व्ही. सपकाळे, सहायक आयुक्त, समाजकल्याण.
(३) श्रीमती सलिमा तडवी, संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती, ठाणे.

सदरहू बैठकीत समितीने सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीतील कर्मचा-यांची जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जातीतील लोकांसाठी राबविण्यात येणा-या योजनेबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

आठवी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी दुपारी २-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) डॉ. मिलींद माने, वि.स.स.
(४) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(५) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(६) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.
(७) श्री. धनाजी अहिरे, वि.स.स.
(८) श्री. विजय **ऊर्फ** भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव.
(२) श्री. आ. ब. राहाटे, अवर सचिव (समिती).
(२) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय.
(२) श्रीमती निलीमा केरकट्टा, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (साविस).
(३) श्री. गिरीष दिनकर भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग.
(४) श्री. रामचंद्र शिंदे, अपर जिल्हाधिकारी, सोलापूर.
(५) श्री. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
(६) श्री. पी. व्ही. बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सोलापूर.
(७) श्री. पी. एम. राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी.
(८) श्री. जी. एल. जगदाळे, मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
(९) श्री. साहेबराव पां. बेंदगुडे, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.

उक्त बैठकीत समितीने दिनांक २० ते २२ जून २०१७ व दिनांक ५ ते ६ जुलै २०१७ या कालावधीत अनुक्रमे सोलापूर व ठाणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांवर कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार साक्षीच्या बैठकीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

नववी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी दुपारी १२-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. मिलींद माने, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(५) श्री. धनाजी अहिरे, वि.स.स.
(६) प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव.
(२) श्री. आ. ब. राहाटे, अवर सचिव (समिती).
(३) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय विभाग.
(२) श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे.
(३) श्री. विवेक भीमनवार, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे.
(४) श्री. मिलींद शंभरकर, आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
(५) श्री. अविनाश ढाकणे, आयुक्त, सोलापूर मनपा.
(६) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग.
(७) डॉ. माधव वीर, उप सचिव, महसूल विभाग.
(८) श्री. एस. टी. जाधव, उप सचिव, नगरविकास विभाग.
(९) श्री. संतोष गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग.
(१०) श्री. आर. ए. खडसे, अवर सचिव, साप्र, विभाग (मावक).
(११) श्री. बाळासाहेब सोलंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण.
(१२) श्रीमती उज्वला सपकाळे, सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे.
(१३) श्री. चंद्रकांत पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि), ठाणे.

(१४) श्री. समीर उन्हाळे, उपायुक्त, ठाणे मनपा.
(१५) श्री. ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त , साप्र. ठाणे मनपा.
(१६) श्री. तुषार मटकर, सहायक आयुक्त (मावक), कोकण भवन.
(१७) श्री. मनिष आर. जोशी आयुक्त, ठाणे मनपा. शिक्षण विभाग.

उक्त बैठकीत समितीने दिनांक २० ते २२ जून २०१७ व दिनांक ५ ते ६ जुलै २०१७ या कालावधीत अनुक्रमे सोलापूर व ठाणे येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीने दिलेल्या आश्वासित मुद्यांवर कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार साक्षीच्या बैठकीच्यावेळी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

दहावी बैठक

अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ रोजी विधानभवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती, सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.
(३) श्री. ज्ञानराज चौगले, वि.स.स.
(४) श्री. धनाजी अहिरे, वि.स.स.
(५) श्री. विजय उर्फे भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(३) श्री. आनंद राहाटे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. पवन म्हात्रे, कक्ष अधिकारी.

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर चर्चा करून किरकोळ दुरुस्तीसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई